# शिक्षक भारती संघटना, कोल्हापूर विभाग बैठकीचे इतिवृत्त दि.११/१०/२०१९

| अ.क. | सर्वसाधारण विषय | कावयाच्या कार्यवाहीचा तपशील | कार्यवाही कोणत्या स्तरावर | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | शालार्थ प्रणालीमध्ये कर्मचारी मान्यता झालेबरोबर त्याबाबत पगारासंदर्भातील कार्यवाही त्वरीत होणेबाबत. | शालार्थ आयडी मिळून बऱ्याच कालावधी होवूनदेखील शिक्षकांचे वेतन अद्याप झालेले नाही.<br>शालार्थ आयडी मिळाल्यानंतर उमेदवाराच्या आधार कार्ड नुसार त्याच्या नावाची व जन्मतारखेची खातरजमा करुन उमेदवाराचे नाव शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून शालार्थ प्रणालीमध्ये नोंदविले जाते. त्यानंतर संबंधीत शाळांनी आपल्या उमेदवारांची सविस्तर माहिती भरुन ती अधीक्षक वेतन पथक यांचे लॉगीनला फॉरवर्ड करणे अपेक्षित आहे.<br>सर्व शिक्षणाधिकारी यांनी शाळांच्या लॉगिनला प्रलंबित असलेल्या शाळांची माहिती घ्यावी व शाळा मुख्याध्यापकांना माहिती तात्काळ भरुन अधीक्षक, वेतन पथक यांना फॉरवर्ड करणेबाबत लेखी सूचना निर्गमित कराव्यात.<br>याबाबत शिाणाधिकारी यांनी आपल्या जिल्हास्तरावर किती शिक्षकांना शालार्थ आयडी मिळाला व किती शिक्षकांचे वेतन सूरु झाले ? याबाबत आढावा घ्यावा. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| २ | दर महिन्यासाठी देय वेतन त्या महिन्यानंतरच्या १ तारखेला अदा व्हावे. | वेतन होण्यास विलंब होत असल्यामळे शाळेच्या कर्मचाऱ्यांची होणारी आयकराची रक्कम कपात करण्यास होतो. आयकराची रक्कम मुदतीत न भरल्यामुळे शाळेला नाहक दंडाची रक्कम भरावी लागते. त्यामुळे वेतन दरमहा व्हावा असे संघटनेकडून नमूद करण्यात आले.<br>सर्व शिक्षणाधिकारी यांनी आपल्या अधिक्षक, वेतन पथक यांना कर्मचाऱ्यांचे वेतन दरमहा १ तारोला अदा व्हावेत अशा सूचना द्याव्यात. शिक्षणाधिकारी यांनीसूध्दा याबाबत आढावा घ्यावा. | शिक्षणाधिकारी / वेतन पथक स्तरावर | -- |
| ३ | ऑनलाईन प्रणालीमध्ये कर्मचाऱ्यांचे नाव येईपर्यंत त्याचे वेतन ऑफलाईन पध्दतीने देणेत यावे. | कर्मचाऱ्यांचे वेतन हे ऑनलाईन प्रणालीमध्येच करणेबाबत वित्त विभागाच्या सूचना असल्यामुळे कर्मचाऱ्यांचे वेतन ऑफलाईन पध्दतीने करता येणार नाही. | -- | -- |
| ४ | कर्मचाऱ्यांच्या प्रॉव्हीडंट फंडातील रक्कमा परतावा/विनापरतावा कमाल १ महिन्याच्या आत प्राप्त व्हाव्यात. | कर्मचाऱ्यांच्या प्रॉव्हीडंट फंडातील रक्कमा परतावा/विनापरतावा कर्मचाऱ्यांना बराच कालावधी होवूनदेखील मिळत नसल्याबाबत संघटनेकडून नमूद करण्यात आले. विशेषतः अधीक्षक, वेतन पथक, कोल्हापूर कार्यालयाकडून बराच विलंब होत असल्याबाबत सांगण्यात आले.<br>सर्व शिक्षणाधिकारी यांनी आपल्या अधिनस्त अधीक्षक, वेतन पथक यांच्या स्तरावर प्राप्त प्रॉव्हीडंट फंडातील रक्कमा परतावा/विनापरतावा प्रास्ताव | शिक्षणाधिकारी / वेतन पथक स्तरावर | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | दाखल झाल्यास त्याची १ महिन्यामध्ये निर्गती होईल याची दक्षता घेणेबाबत सूचना द्याव्यात. | | |
| ५ | प्रॉव्हीडंड फंड खात्यातील जमा खर्चाच्या स्लिपा जूलै अखेर मिळाव्यात. डी.सी.पी.एस. धारकांना त्यांच्या खात्यातील हिशोबाच्या स्लिप दरवर्षी देणेत याव्यात. | संस्था/शाळा मुख्याध्यापकांच्याकडून शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नेमणूक आदेशाची प्रत, वैयक्तिक मान्यता आदेशाची प्रत, सेवा दाखले, सेवाज्येष्ठता यादी इ. अशा अनेक प्रकारच्या सेवाविषय कागदपत्रे उपलब्ध करुन दिली जात नाहीत. तसेच शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे नियुक्ती होवून बराच कालावधी उलटनही त्याचे सेवापुस्तक अद्यापपर्यंत तयार केले जात नसल्याबाबत संघटना प्रतिनिधीकडून सांगण्यात आले.<br>सर्व शिक्षणाधिकारी यांनी शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मूळ सेवापुस्तक, सेवाज्येष्ठता यादी तसेच दुबार सेवापुस्तक व इतर अनुषंगीक सेवाविषयक बाबींची कार्यवाही दि. ३१ मे २०२० अखेर पूर्ण होईल याबाबतचे नियोजन करावे. याबाबत शिक्षणाधिकारी यांनी सर्व शाळा मुख्याध्यापक यांना परिपत्रकान्वये याबाबतच्या सूचना निर्गमित कराव्यात. शिक्षणाधिकारी यांनी अधीक्षक, वेतन पथक यांना दरमहा वेतन देयके स्विकारताना उपरोक्त कार्यवाहीबाबत काय प्रगती झाली याबाबत दरमहा नियमित आढावा घेणेबाबतच्या सूचना द्याव्यात.<br>उपरोक्त कार्यवाही दि. ३१ मे २०२० अखेर पूर्ण होण्यासाठी संघटनेनेदेखील शिक्षणाधिकारी तसेच अधीक्षक, वेतन पथक यांचेसोबत समन्वय साधून उपरोक्त कार्यवाही यशस्वीरित्या पार पाडण्याबाबत सहकार्य करावे. | शिक्षणाधिकारी / वेतन पथक स्तरावर | -- |
| ६ | सर्व कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकाची दुबार प्रत दरवर्षी पूर्ण करुन मिळणेबाबत शाळांना आदेशीत करणेत यावे. | | | |
| ७ | ७ व्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती करण्यासाठी एकाच वेळी त्या प्रशालेतील सर्व कर्मचाऱ्यांची फेरतपासणी होणेबाबत कार्यवाही व्हावी. | ७ व्या वेतन आयोगाच्या वेतन निश्चितीबाबत लेखाधिकारी यांचेकडून शिबीरे आयोजित करण्यात आली नसल्याबाबत सांगण्यात आले. विशेषत: लेखाधिकारी, सांगली यांच्याबाबत बऱ्याच तक्रारी असल्याचे संघटनेकडून सांगण्यात आले. सांगली जिल्हयामध्ये काही कर्मचाऱ्यांची ७ व्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती ही जाणूनबूजून केली जात नसल्याबाबत सांगण्यात आले.<br>याबाबत लेखाधिकारी, सांगली यांना दूरध्वनीद्वारे सूचना देण्यात आल्याचे तसेच लेखाधिकारी यांचेकडील प्रलंबित विषयाबाबत सर्व विभागातील लेखाधीकारी यांची बैठक आयोजित करण्यात येणार आहे. सदरहू बैठकीमध्ये लेखाधिकारी यांना योग्य त्या सूचना देण्यात येतील. | लेखाधिकारी, लेखा तपासणी पथक कोल्हापूर विभाग | -- |
| ८ | संस्था अंतर्गत वादामुळे रखडलेल्या मुख्याध्यापक | संस्था अंतर्गत वादामुळे रखडलेल्या मुख्याध्यापक पदोन्नती/वरिष्ठ. | शिक्षणाधिकारी | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | पदोन्नती/वरिष्ठ श्रेणी/निवड श्रेणी प्राप्त शिक्षकांना त्वरित न्याय मिळणेबाबत कार्यवाही व्हावी. | श्रेणी/निवड श्रेणी प्राप्त बऱ्याच शिक्षकांना मिळालेल्या नाहीत. मुख्याध्यापकांकडून प्रस्ताव वेळेत प्रस्ताव पाठविले जात नाहीत.<br>सर्व शिक्षणाधिकारी यांनी याबाबत आढावा घेवून शाळा मुख्याध्यापक यांना प्रलंबित असलेल्या /वरिष्ठ श्रेणी/निवड श्रेणी प्राप्त शिक्षकांचे प्रस्तावांवर तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना द्याव्यात. मुख्याध्यापक पदोन्तीबाबत सर्व शिक्षणाधिकारी यांनी शासन निर्णय दि.०७/०३/२०१० नुसार कार्यवाही करावी. | स्तरावर | |
| ९ | एका संस्थेतील कर्मचाऱ्यांच्या बदल्यांना त्वरित मान्यता मिळणेबाबत कार्यवाही व्हावी. | एका संस्थेतील कर्मचाऱ्यांच्या बदल्यांना बदली मान्यता वेळेत दिली जात नाही. विशेषतः सांगली जिल्हयामध्ये प्रलंबित आहेत.<br>याबाबत शिक्षण उपसंचालक कार्यालयातून सर्व शिक्षणाधिकारी यांना बदली मान्यतेच्या प्रस्ताव १ महिन्यामध्ये निकाली काढण्याबाबत लेखी सुचना द्याव्यात. | शिक्षण उपसंचालक / शिक्षणाधिकारी | -- |
| १० | अनुदानित शाळेत रिक्त जागांवर बदलीने आलेल्या विना अनुदानित शाळेतील शिक्षकांच्या बदली मान्यता देणेत याव्यात. | सर्व शिक्षणाधिकारी यांनी शासन निर्णय दि. २८/०६/२०१६ नुसार कार्यवाही करावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| ११ | शाळांमध्ये संच मंजूरी देताना त्या शाळेतील इयत्ता ५ वी ते १२ वी पर्यंत मंजूर शिक्षक पदे ध्यानी घेवून मुख्याध्यापक/उपमुख्याध्यापक/ पर्यवेक्षक पदांना मंजूरी देणेबाबत कार्यवाही व्हावी. | संच मान्यता ही एनआयसी, पुणे यांचेकडून केली जाते. संच मान्यतेमध्ये तांत्रिक कारणास्तव कार्यरत पदे दिसत नसतील ती एनआयसी, पुणे व शिक्षण संचालनाल (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांचेकडून दुरुस्ती करुन घेणे अपेक्षित आहे. संच मान्यतेत दुरुस्ती न झाल्यामुळे मुख्याध्यापक/उपमुख्याध्यापक/ पर्यवेक्षक ही पदे उपलब्ध दिसत नसल्याबाबत पदोन्नती देता येत नाही. संच मान्यता दुरुस्ती झाल्यास ही अडचण दुर होईल.<br>सन २०१९-२० च्या संचमान्यतेस शासनाकडून स्थगिती देण्यात आली आहे. त्यामुळे हया वर्षी शिक्षक अतिरिक्त होणार नाही. | एनआयसी, पुणे /संचालनालय स्तरावर | -- |
| १२ | बऱ्याच शाळांमधून चुकीच्या संच मान्यता नियमानुसार दुरुस्त करण्यात याव्यात अडचणी येत आहेत. त्या संच मान्यता नियमानुसार दुरुस्त करण्यात याव्यात तो पर्यंत संबधीत शाळेतील शिक्षक संख्या कमी/अधिक करणेत येवून नये. | | | |
| १३ | विभागातील शिक्षकांना देय असलेल्या वरिष्ठ श्रेणी/निवड श्रेणी तसेच कलाशिक्षकांना ए.एम. वेतनश्रेणी आवश्यक शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यावर त्वरित मान्यता देणेत यवी. | सातारा जिल्हयामध्ये ए.एम. वेतनश्रेणीबाबतचे बरेच प्रस्ताव प्रलंबित आहेत. सातारा जिल्हयामध्ये अशा मान्यता देण्यात येत नाहीत. कलाशिक्षकांना ए.टी.डी. मधून ए.एम. श्रेणीमध्ये गेल्यानंतर त्यांना डी.एड ऐवजी बी.एड ही वेतनश्रेणी मिळणे आवश्यक आहे.<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. सातारा यांनी याबाबत शासन निर्णयातील तरतुदीनुसार निर्णय घ्यावा. | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.सातारा | -- |
| १४ | खाजगी माध्यमिक/ उच्च माध्यमिक शाळामधील शिक्षकांनी पाठ टाचण वही काढणेबाबत स्पष्टीकरण | याबाबत दि.२२/०६/२०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहे. धोरणात्मक बाब असल्यामुळे याबाबत शासनस्तरावर निवेदन सादर करावे. | शासन स्तरावर | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | मिळावे. | | | |
| ➢ | **आयत्या वेळचे विषय -** | | | |
| १ | चेकलिस्ट तयार करणे | जिल्हा शिक्षणाधिकारी कार्यालयातील प्रतिनिधी व जिल्हा संघटनेचे प्रतिनिधी यांनी एकत्र येवून पुनश्चः नव्याने एक हस्तपुस्तिका तयार करावी व ती विभागाच्या संकेतस्थळवर प्रसिध्द करण्यात यावी. सदरहू कार्यवाही माहे-नोव्हेंबर अखेर पूर्ण करण्यात यावी. | शिक्षण उपसंचालक / शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| २ | लिपिक प्रशिक्षण | मागील वर्षी झालेल्या संघटना बैठकीमध्ये सर्व शिक्षणाधिकारी यांना एक दिवसीय लिपिक प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. परंतु सांगली जिल्हा वगळता कोणत्याही शिक्षणाधिकारी कार्यालयाकडून प्रशिक्षण सर्व आयोजित करण्यात आले नाही.<br>सर्व शिक्षणाधिकारी यांनी वेळापत्रक तयार करुन प्रशिक्षणाबाबत लिपिकांचे एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करुन त्यांना मार्गदर्शन करावे. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| ➢ | **सर्वसाधारण सूचना :-** | | | |
| | संघटना अधिकृत असलेला पुरावे सादर करणे. | सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि. ०२ जानेवारी २०१७ नुसार आपली संघटना अधिकृत असलेबाबचे पुरावे सादर करावे. अधिकृत असलेल्या संघटनेचीच बैठक पुढे आयोजित करण्यात येतील. | संघटना स्तरावर | -- |

**(सत्यवान सोनवणे)**
**शिक्षण उपसंचालक**
**कोल्हापूर विभाग, कोल्हापूर**